| MHKO070021592024 | **पी.डब्ल्यु.डी.व्ही अर्ज क्र.४६/२०२४**<br>**(स्नेहल मोरे )**<br>**–विरुध्द–**<br>**(संग्राम मोरे )** |
| --- | --- |

**नि.क्र.१४ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वि.प.क्र.१ ते ४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्ज व म्हणणे वाचले. अर्जदार यांनी सदारचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कलम १८, १९, २० व २२ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांनी अंतरिम पोटगीचा अर्ज देखील दाखल केलेला आहे. प्रस्तुत मूळ अर्जाच्या स्वरुप पाहता वि.प. यांचे म्हणणे अभिलेखावर घेणे व त्यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांचा बचाव व म्हणणे मांडणेची संधी देणे हे न्यायाने गरजेचे आहे. जर त्यांना ती संधी न दिल्यास त्यांचा बचाव अथवा म्हणणे मांडण्याचा हक्क नाकारल्यासारखे होईल. जर वि.प. यांचे म्हणणे अभिलेख सदरी आले तर सदरचे प्रकरणे गुणदोषावर निर्णीत करणेस मदतच होईल. परंतु त्याच बरोबरीने वि.प. यांनी त्यांचे म्हणणे दाखल करणेस केलेला विलंब हा देखील दुर्लक्षीत करता येणार नाही. यापुर्वी माझे पुर्व पिठासीन आधिकारी यांनी नि.१० कडे वि.प. यांना रक्कम रु.३००/– चा खर्च बसवून मुदत दिली होती. मात्र तो देखील खर्च वि.प. यांनी भरला नसल्याचे दिसून येत आहे. सबब, सदरचा अर्ज हा रक्कम रु.२००/– चा खर्च हा अर्जदार यांना देणेचे अटीवर तसेच पुर्वी नि.१० वर झालेल्या खर्चाची रक्कम ही अर्जदार यांना देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो. सदर एकूण खर्चाची रक्कम रु.५००/– ही अर्जदार यांना दिल्यानंतर वि.प. यांचे म्हणणे अभिलेखावर घेणेत यावी.

PATIL MAYUR SAMPAT

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.10.10 11:44:30 +0530

दि.०९/१०/२०२५

**(एम. एस. पाटील )**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर